श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक. १ ] चैत्र [ श. १८५१



नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्

क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| शिर्डीवृत्त ... ... ... ... ... | १-७ |
| अनुभव ... ... ... ... ... | ८-१३ |
| बाबांची भिक्षा व न्याहरी ... ... ... | १४-२१ |
| जाहीर खबर ... ... ... ... ... | २२ |
| श्रीसंतकथामृत—अध्याय १२ ... ... ... | ८३-९२ |


## विनंति.

प्रस्तुत चैत्र महिन्याचा अंक ग्राहकांकडे पाठविण्यांत येत आहे. ज्यांची शके १८५५ ची वर्गणी अद्यापि आली नाहीं त्यांनीं ती पाठविण्याची कृपा करावी. व्ही. पी. नें पाठविण्याची विनंती आल्यास व्ही. पी. करण्यांत येईल.

—**संपादक.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्याबर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं.रु.२.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

— प्रकाशक.

# शिर्डीवृत्त

गल्या मार्च १९३३ या महिन्यात शिर्डी येथें श्रीसाईबाबा समाधि-दर्शनाकरितां १८ संतप्रेमी बांधव व साईभक्त येऊन गेले. ते मुंबई, उपनगर, नाशिक, चाळीसगांव, जामनेर, पंढरपूर, इंदूर, नागपूर, देवास, अहमदनगर, गवराई (निजाम संस्थान) या ठिकाणाहून आले होते. त्यांत जहागिरदार, ॲडव्होकेट, व्यापारी,पोलिस सबइन्स्पेक्टर वगैरे मंडळी होती.

श्रीयुत दादाजी गोपिनाथ जोशी, दादर-मुंबई यांनीं श्रीस ता. २२।२।३३ पासून अभिषेक सुरू केला होता, त्याची समाप्ति ता. २३।३।३३ रोजीं झाली.

दाभोळकरकृत श्रीसाईसच्चरिताची फार मागणी श्रीसाईभक्तांकडून व इतर संतप्रेमी बांधवांकडून येत आहे. त्याच्या प्रती हल्लीं शिल्लक नसल्यामुळें त्या छापविण्याची तजवीज केली जात आहे. श्रीसाईलीला ज्या छापखान्यांत छापली जाते, त्या छापखान्याच्या मालकांस त्यांनीं पूर्वीं दुसरीं पुष्कळ कामें घेतलीं असल्यामुळें हा ग्रंथ चातुर्मास सुरू होण्यापूर्वीं छापून भक्तांच्या हातांत पडेल अशी हमी देतां येत नसल्यानें तो ग्रंथ दुसऱ्या छापखान्यांतून छापवून चातुर्मास सुरू होण्यापूर्वीं भक्तांच्या हातांत पडेल अशी तजवीज केली जात आहे. म्हणजे श्रीसाई सच्चरिताचे सप्ते, आवर्तनें वगैरे करण्यास विलंब होणार नाहीं.

श्रीयुत बाळासाहेब देव यांच्या "शिर्डी कशी असावी ?" हा लेख श्रीसाईलीलेच्या ४ थ्या वर्षाचे ७ ते १० अंकांत प्रसिद्ध झाला आहे. जरी पैशाच्या अभावी तीं सर्व कामें तूर्त एकदम करितां येत नाहींत, तरी रोजच्या श्रीच्या पूजाअर्चांचीं कामें व्यवस्थित रीतीनें झालीं पाहिजेत, म्हणून त्याच्या खर्चाकरितां निदान एक लक्ष रुपयांचा निधि जमला पाहिजे. म्हणजे त्या

रकमेवरील व्याजांतून पूजा वगैरे कामाची कायमची व्यवस्था होईल. आतां कायम निधीची रक्कम रु. पन्नास हजार पर्यंत झाली आहे. ह्या रकमेवरील व्याजाची रक्कम आतां अपुरी होते. तरी सर्व भक्तांनीं मिळून हा निधि रुपये एक लक्षपर्यंत वाढविण्याचें श्रेय घ्यावें अशी प्रेमपूर्वक विनंती आहे.

श्रीसाई समाधि मंदिरांत श्रीसाईबाबा यांची संगमरवरी दगडाची मूर्ति स्थापण्याबद्दल संस्थानकार्यकारीमंडळाचा ठराव ता. २३।१०।१९२० रोजीं होऊन त्यास आज चार वर्षें होऊन गेलीं आहेत. ह्या ठरावास आज पैशाच्या अभावीं मूर्त स्वरूप देतां येत नाहीं; म्हणून तो ठराव दप्तरांत तसाच पडून राहिला आहे. मूर्ति तीनचार फूट उंचीची करण्यास सुमारें तीन चार हजार-पर्यंत खर्च येईल. आतांपर्यंत मूर्तिच्या बदली श्रीसाईबाबांची मोठी तसबीर समाधीच्या मागच्या बाजूस मध्यंतरी चांदीच्या आसनावर ठेवली आहे, त्याची पूजाअर्चा रोज होत असते व त्यास रोज पीतांबर नेसवितात, गंध लावितात व हार घालतात. तसबीर रोज वापरल्यानें खराब होते.एकदा मूर्ति बसविली म्हणजे श्रीसाईमंदिरांत सगुण भक्ति करणारांस मूर्तिचें ध्यान धरण्यास सोपें होऊन परमानंद होत जाईल. पैशाच्या अभावीं मूर्तिची स्थापना अजूनपर्यंत झाली नाहीं. त्याचप्रमाणें श्रीसाईबाबामहाराज यांनी स्वतः श्रीरामचंद्र, लक्ष्मण, सीता, हनुमंत यांच्या संगमरवरी दगडाच्या मूर्ति विकत घेतलेल्या आहेत, त्यांची ही स्थापना अजूनपर्यंत झाली नाहीं. ह्या मूर्ति श्रीसाईबाबांच्या मूर्तिच्या मागील बाजूस उंच चौथऱ्यावर बसविण्याचा विचार आहे

ता. ३१।३।२३.

**सुं. दि. नवलकर,**
ऑ. सेक्रेटरी

# श्रीसाईबाबा

## एप्रिल महिन्याचें शिर्डीवृत्त

श्रीशिर्डी येथें श्रीसाईबाबामहाराजांच्या दर्शनास एप्रिल महिन्यांत १०४ भक्तजन येऊन गेले. ह्याशिवाय श्रीसाईबाबांच्या रामनवमीउत्सवांत आलेल्या मंडळाची संख्या ३००० वर होती. दर्शनाकरितां आलेली भक्त-मंडळी पुढील ठिकाणाहून आलेली होती. मुंबई, मुंबई सबर्बन जिल्हा—बांद्रें, कुर्ला, सान्ताक्रूझ, अंधेरी, विलेंपार्ले, मालाड, कांदिवली, बोरीवली, ठाणें जिल्हा, ठाणें, चिंचणी, बलसाड, पुणें, सोलापूर सातारा, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, कळवण, चाळीसगांव, कुलाबा जिल्हा—पेण; रत्नागिरी जिल्हा माल-वण, दापोली; खामगांव हुशंगाबाद, सावंतवाडी, कुडगांव ता. शेंगांव, स्वग-गांव ता. गंगापूर;

## श्रीसाईबाबांचा रामनवमीउत्सव

शिर्डी येथें श्रीसाईबाबांचे जे चार उत्सव केले जातात, त्यांपैकीं राम-नवमीउत्सवाची जबाबदारी ह. भ. प. दासगणूमहाराज यांनीं घेतली आहे. त्याप्रमाणें ते उत्सव फार उत्कृष्ट रीतीनें साजरा करितात. उत्सवाकरितां त्यांस मदत वगैरे करण्याकरितां त्यांच्याबरोबर सुमारें ३० मंडळी आली होती. प्रत्येकजण उत्साहानें आपापल्या परीनें कामें करीत होते. उत्सवाची यात्रा यंदा चांगली भरली नव्हती. सुमारें ३००० लोक आले होते. कमी यात्रा जमण्याचें कारण व्यापारधंद्यांच्या मंदीमुळें, लोकांच्या आर्थिक स्थितीमुळें असावें. उत्सव चांगल्या रीतीनें पार पडला. उत्सवास सोमवार ता. ३।४।३३ चैत्र शुद्ध अष्टमीस सुरवात होऊन तो ता. ८।४।३३ चैत्र शु. १२ काला होऊन समाप्त झाला. उत्सवांत ह. भ. प. दासगणूमहाराज यांचीं कीर्तनें, शिवाय खामगांव येथें स्थापलेले भजन मंडळाचे सभासद श्री. त्रिंबक लक्ष्मण ओक वकील व श्रीयुत वामन विठ्ठल दातार वकील यांचीं कीर्तनें झालीं. ते जरी धंदेवाईक कीर्तनकार नव्हते तरी यांचीं कीर्तनें चांगलीं वठलीं. तरी ते बापुडें ज्या ज्या

प्रसंगाकरितां कीर्तनें करितील तीं त्या प्रसंगाच्याच विषयांस अनुसरून असावींत. उगाच प्रस्तुत समारंभाला लागू नाहींत, असें बाहेरील विषयांचें प्रतिपादन करूं नये, अशी त्यांस माझी नम्र विनंती आहे. म्हणजे त्यांच्यासंबंधीं गैरसमज होणार नाहीं. त्यांचा गौरव दासगणूमहाराज यांनीं त्यांना रेशीमकांठी उपरणी देऊन केला. खामगांव येथील मंडळीनें भजनमंडळ स्थापून स्तुत्य उद्योग केला आहे. तसेंच आजपर्यंत बिझिक क्लब, गंजिफा क्लब, बुद्धिबळ क्लब प्रमाणें खामगांव येथील मंडळीनें आपल्या मनाच्या करमणूकींकरितां हें मंडळ स्थापिलें आहे. ह्यांत दोन्ही कामें होतात. एक मनाची करमणूक होऊन मन ईश्वरभक्तीकडे रमलें जातें.

येत्या उत्सवांत पाहुणेमंडळीची जागेच्या अडचणीमुळें फार गैरसोय झाली त्याबद्दल संस्थानकमिटीच्या वतीनें मी दिलगिरी प्रदर्शित करितों. हल्लीं शिर्डी येथें तीन वाडे आहेत. १ श्रीयुत रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर ( पूर्वी साठेसाहेबांचा होता. ) यांचा वाडा. ह्या वाड्यांतील तळमजल्यावरील सर्व जागा भाडेकऱ्यांना दिलेली आहे. माडीवर फक्त दोन खोल्या आहेत; त्यांपैकीं एक श्रीयुत नवलकर यांनीं स्वत:करितां ठेविली आहे. दुसरी खोली आहे ती संस्थानच्या विनंतीस मान देऊन ते पाहुण्यामंडळीच्या उपयोगाकरितां देतात.

( २ ) कै. हरि सीताराम दीक्षित अथवा काकासाहेब यांचा दीक्षित वाडा. ह्या वाड्यापैकीं तळमजल्यावरील दिवाणखाना व दोन खोल्या व ओटा कै. काकासाहेब दीक्षित यानीं शिर्डी येथें येणाऱ्या श्रीसाईभक्तजनांच्या राहाण्याच्या सोईकरितां त्यांच्या वुईलमध्यें नमुद केलेलें आहे. वाड्याची बाकीची जागा, माडीवरील दिवाणखाना व त्यास लागून असलेली खोली व तळमजल्यावरील बाकीच्या खोल्या व जागा वगैरे स्वत: वापरण्याकरितां ठेवलेल्या आहेत; तरी ही सर्व जागा, माडीवरील दिवाणखाना, खोल्या वगैरे काकासाहेब यांचे चिरंजीव यांनीं व संस्थाननीं त्यांचा उपयोग करून घेण्याकरितां दिलेली आहे. ही जागा तूर्त रिकामी नसल्यामुळें ती सर्व भक्तजनांस राहण्यास मिळत नाहीं.

(३) कै. गोपाळराव बुटी यांचा वाडा ज्यांत श्रीसाई समाधि आहे व जो श्रीसाईमंदिर ह्या नांवानें आतां प्रसिद्ध आहे, ह्याचा माडीवरील भाग श्रीमंत बूटीबंधू यांच्या खासगी उपयोगाकरितां आहे, तरी ते आजपर्यंत संस्थानच्या विनंतीस मान देऊन ती जागा भक्तजनांस राहाण्यास देत होते. आतां त्या माडीवरील जागेची व्यवस्था त्यांनीं आपल्या हातात घेतली आहे. त्यामुळें तेथें श्रीसाईदर्शनास येणाऱ्या भक्तजनांचीं गैरसोय होण्याचा संभव आहे. ह्याबद्दल श्रीमंत बूटीबंधु विचार करितील.

वरील तीन वाडे यांशिवाय संस्थानच्या मालकीच्या जागा आहेत. त्या साईभक्तानें संस्थानास देणगी दिलेल्या आहे.

( १ ) कै. काकासाहेब दीक्षित यानीं दिलेल्या जागेच्या एका बाजूस घर बांधलेलें आहे; बाकी इतर मोकळी आहे. घर खेडे गांवच्या मंडळीस राहण्याजोगें आहे म्हणून त्याचा उपयोग शहरांतील भक्तजन मंडळास राहण्यास योग्य नाहीं, म्हणून भाड्यानें दिलें आहे.

( २ ) कै. नानासाहेब चांदोरकर यानीं दिलेल्या जागेवर घर आहे, तें शहरांतील मंडळीच्या राहण्याच्या उपयोगी नाहीं, म्हणून संस्थाननें भाड्यानें दिलें आहे.

( ३ ) रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं दिलेली जागा ती साईलेंडीबाग या नावानें प्रसिद्ध आहे. ह्यांत घरें वगैरे कांहीं नाहीत.

( ४ ) संस्थानची कोठीची जागा, ह्यावरील घर पडीत स्थितींत आहे. या वरील चार जागांपैकीं पहिल्या जागेंत लहान लहान घरें बांधण्याची सोय आहे. ह्या जागेवर दोन खोल्या व एक ओटा अशा सोईची घरें बांधलीं म्हणजें भक्तजनांची राहण्याची गैरसोय दूर होईल. ह्या जागेची लांबी दक्षिण उत्तर १४१ फूट व पुर्वपश्चिम ७९ फूट आहे. ह्या जागेवर भक्त-जनांनीं रक्कम दिल्यास घरें बांधण्याचा संस्थानकमिटीचा विचार आहे. तूर्त पैशाच्या अभावीं संस्थानकमिटीस ह्या बाबीसंबंधीं कांहींच करितां येत

नाहीं. संस्थानच्या श्रीसाईबाबांचा रोजच्या पूजेअर्चेचा खर्च जेमतेम कायम-फंडाच्या व्याजांतून भागविला जातो. कायम फंड एक लाख रुपये होईपर्यंत संस्थानकमिटीस दुसऱ्या इतर गोष्टी करण्यास सवड सांपडणार नाहीं.

## संस्थान कार्यकारी मंडळाची सभा

संस्थान कमिटीची कार्यकारी मंडळाची सभा शिर्डी येथें ता. ४ व ५ एप्रिल रोजीं भरली होती; त्या सभेंत शके १८५५ करितां अंदाजपत्रक मजूर झाले आहे. त्या पत्रकाप्रमाणें ३२५ या रकमेची तूट येत आहे. श्रीयुत बाळकृष्ण विश्वनाथ देव अथवा बाळासाहेब देव यांनीं श्री साईमंदिरांत रोज सकाळ-संध्याकाळ गाणें, दोन प्रहरीं श्रीसच्चरित व ज्ञानेश्वरी पुराण व रात्रीं भजन करण्याकरितां श्रीरोळकर गवयांची नेमणूक केली आहे व त्यांचा पगार दरमहा रु. २० प्रमाणें एक वर्षभर देण्याबद्दल स्वत:वर मोठ्या उल्हासानें जबाबदारी घेतली आहे. संस्थानकमिटीनें पैशाच्या अडचणीमुळें व तशांत ३२५ रुपयांची तूट येत असल्यामुळें ही जबाबदारी घेतली नाहीं.

## एप्रील महिन्यांत संस्थानास आलेल्या देणगी जिनसा वगैरे.

१ श्रीयुत दादाजी गोपिनाथ जोशी--दादर, मुंबई. यांनीं श्रीद्वारकामाई मशिदींतील श्रीसाईमहाराजांची तसबीर ठेवण्याकरितां देव्हारा आहे तो सुबक तेली रंगानें रंगविण्याकरितां रु. १५ रंगवाला यास दिले. त्याचप्रमाणें श्रीद्वारकामाईस तेली रंग लावण्याकरितां त्यांनीं रु. ५२ खर्च केले. चावडीस लावण्याकरितां १ डझन तसबिरा रु. ३ किंमतीच्या दिल्या. एक पेट्रोम्याक्स कंदिल किंमत रु. १४ श्रीद्वारकामाई मशिदींत श्रीसाईबाबांच्या तसबिरीजवळ लावण्याकरितां, श्रीसाईबाबास सात वारांचे सात रंगाचे रेशमी व कलाबुति किनारीचे स्वत: घरीं हातीं केलेले गलेफ व त्याचप्रमाणें एक चांदवा-अर्पण केले. गरिबांस काजू खारका वांटल्या व साईस ४ वेळां अभिषेक केला व ब्राह्मणास सुवर्ण दिलीं.

२ ता. २०।४।३३ रोजीं बांद्रें येथील साराबाई हिनें श्रीसाईबाबांच्या द्वारकामाई मशिदींत तेलाचा दीपोत्सव केला.

३ ता. २७।४।३३ इंदूर येथील श्रीमंत भवानराव वनसुडे यांनी श्रीसाईपुढें दोन मुलांचा नामकरणविधि करून राम व कृष्ण ही नांवें ठेविली. मंदिरांत मुलांचे भारोभार साखर वांटली व श्रीस अभिषेक केला व २०० माणसें जेवूं घातलीं. श्रीस रेशमी गलेफ अर्पण केला व २०० सुवासिनींस नारळ-खण वांटले.

४ रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं श्रीचे मंदिरांत देवा-समोर टांगण्याकरितां कशिदाच्या कामांत मढविलेला श्रीचा फोटो अर्पण केला.

५ श्रीयुत बाळकृष्ण वि. देव यांचे हस्ते श्रीयुत पेंढारकर यांनीं श्रीस नैवेद्याकरितां १ चांदीची वाटी-वजन १२ तोळे-दिली.

६ श्रीयुत विनायक अप्पाजी वैद्य-अंधेरी, १ पितळेची समई

७ रघुनाथ त्रिंबक गिरधर,-अंधेरी १ घांट

८ दामोदर विनायक गिरधर,-अंधेरी १ पितळेची समई व एक घांट

९ सजनभाई बागवान, बेलापूर-२ गेलेफ व ७॥ पायलीचा गोडा भात.

१० आनंदा पांडूजी चिखलठान, चिखलठान, ता. औरंगाबाद, तीन पायलीचा गोडा भात.

११ गणपतराव देशपांडे शिरोळकर, गवई यांनीं कायमफंडास आठ आणे दिले. ह. भ. प. विश्रामबुवा यांचीं २ कीर्तनें ता. २० व २२ एप्रिल रोजीं श्रीचे मंदिरापुढें झालीं त्यावेळीं दिड हजार लोक जमले होते.

ह. भ. प. दासगणूमहाराज यांचा मुक्काम अद्याप शिर्डीस असून त्यानीं ता. २०।२३ व२७ रोजीं श्रीमंदिरांत कीर्तन केलें. ता. २७।४।३३ रोजीं दासगणूमहाराज. यांनीं परशरामजयंती निमित्त कीर्तन केलें व गाईना चारा घातला व शिऱ्याचा प्रसाद व उसाचा रस वांटला व ब्राह्मणाना दक्षिणा व कपडे वांटले.

ता. ५ मे १९३३

**सुं. द्वि. नवलकर,**
ऑ. सेक्रेटरी,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान**

# अनुभव

हल्लीं शिर्डी येथील श्रीद्वारकामाईमध्यें जें बाबांचे पेन्टिंग आहे, त्याबद्दल संक्षिप्त इतिहास. हें पेंटींग रा. शामराव वि. रा. जयकर यांनीं शिर्डींत त्यांचे जवळ जवळ दोन वर्षांचें वास्तव्य असतांना तयार केलें व कांहीं देवघेवीसंबंधानें त्यांनीं शिर्डींतून परत येतांना श्री. तात्याजी गणपतराव कोते पाटील ह्यांच्या स्वाधीन केलें तें पेंटिंग द्वारकामाईच्या आग्नेयेकडील कोंपऱ्यावर भिंतीला घडयाळानजीक बरेच दिवस टांगलेलें होतें तें पावसांत भिजत होते व उन्हांत तापत होतें. असा बराच काळ गेला. बाबांनीं समाधि घेतल्यावर तें बराच काळ तात्या पाटलाच्या घरीं होतें. सन १९२१ सालीं पुण्यतिथीच्या उत्सवाचे वेळीं श्री. काकासाहेब दीक्षित ह्यांच्या मनांत आल्यावरून श्री. तात्याबास त्या पेंटिंगऐवजीं दुसरा बाबांचा फोटो देण्याचें कबूल करून ते पेंटिंग शिर्डीहून सांताक्रूझ येथें साई प्रधान बागेंत आणलें व श्री.जयकर आर्टिस्ट हे पार्ल्याहून रोज सकाळीं १० बाजतां सांताक्रुझ येथें येऊन सायंकाळीं ६ बाजेपर्यंत त्या पेंटिंगवर काम करून पार्ल्यास परत जात असत. असें जवळ जवळ ५ ६ आठवडे काम चालू राहून तें पेंटिंग पुरें झालें. श्री. जयकर यांनीं शिर्डी संस्थानची सेवा ह्या नात्यानें हें पेंटिंग तयार केलें; कारण, ते रा. प्रधान यांजकडून फक्त साहित्यखर्चाचेच पैसे घेत असत. व पेंटिंगची कांच, फ्रेम वगैरे रा. प्रधानांनीं रा. जयकरांजवळून सर्व पूर्ण करविलें. त्या पेंटिंगचा शिर्डीस नेण्याचा पिंजरा बराच अगडबंब झाला. तो सांताक्रूझहून बोरीबंदर स्टेशनपर्यंत फर्स्टक्लासमधून निर्विघ्नपणे पोंहचला. बोरीबंदरावर जरी एक अखंड सेकंडक्लास, ( रा. काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर, रा. गुरुजी (दळवी व. रा. प्रधान या चौघांकरितां) रिझर्व्ह केलेला होता, तरी स्टेशनवरील तिकिटकलेक्टर तो पिंजरा सेकंडक्लासांत ठेऊं देईना, ब्रेकव्हॅनमध्यें टाका असा अडथळा करूं लागला. ही तक्रार घाटकोपर म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट मि. फेरोजशहा बकील जे प्रधानांच्या विरुद्ध कौन्सिलइलेक्शनला उभे राहिले

होते त्यांनीं पाहिल्याबरोबर धांवत प्रधानाजवळ आले व काय भानगड आहे असें विचारत, त्यांना तें श्रीबाबांचें पेंटिंग आहे व शिर्डीस न्यावयाचें आहे वगैरे कळल्याबरोबर ते तिकिटकलेक्टरला म्हणाले, "प्रधानसाहेब कौन्सिलचे मेंबर आहेत, यांचा स्वतंत्र डबा रिझर्व्ह आहे, तूं विनाकारण अडथळा करूं नकोस." तरी तो कांहीं ऐकेना. असें पाहातांच मि. फिरोशहा संतापले व म्हणाले, "प्रधानसाहेब स्वस्थ राहा. मीं आतां स्टेशन-सुपरिन्टेंडन्टला येथें आणतों. तो पाहा समोरच उभा आहे. असें बोलतात व फेरोजशहा व प्रधान हे सुपरिन्टेंडन्टकडे जाऊं लागतात; व हें सर्व सुपरिन्टेंडन्ट तेथून पाहत होताच. इतक्यांत, लेफटनन्ट कर्नल मर्फीसाहेब मुंबई सरकारचे डिरेक्टर ऑफ हेल्थ हे तेथे आले व एकदम प्रधानसाहेबांस विचारूं लागले काय कोठे स्वारी चालली ? प्रधानसाहेब मर्फीसाहेबां-बरोबर गोष्टी करूं लागले त्यांत व बाबांचे पेंटिंगबद्दलची तक्रार त्यांच्या कानीं ते घालीत होते. व त्या गोष्टी सुपरिन्टेंडन्ड यास ऐकूं येतिल इतक्याच अंतरावर ते होते, व इकडे फेरोजशहा वकील हे सुपरि-न्टेंडन्ट ह्याजवळ गाऱ्हाणें करण्यास पोहचलेच होते. सुपरिन्टेंडन्ट व फेरो-जशहा हे तिकिटकलेक्टरकडे जाऊन काकासाहेब दीक्षित, दाभोळकर, गुरुजी, हे पेंटिंगच्या पिंजऱ्याजवळ उभे होते. त्यांना खुण करून तो पिंजरा रिझर्व्ह्ड् केलेल्या डब्यांत स्वतः सुपरिन्टेंडन्टने वर चढून व्यवस्थेशीर रीतीनें स्टेशनच्या पोर्टराकडून ठेवविला व तसदिची माफी असावी असें काका-साहेब दीक्षितांना म्हणाला. इतक्यांत प्रधानसाहेब मर्फीसाहेबांबरोबरच्या गोष्टी संपवून तिकिटकलेक्टर व सुपरिन्टेंडन्ड यांच्या सलामी घेत घेत गाडींत चढले. अद्भुत लीला बाबांची ! तेंच तें पेंटिंग हल्लीं द्वारकामाईंत वास्तव्य करून हरएक भक्तास मोहक दर्शन देत राहिलें आहे. काकासाहेब दीक्षित हे पार्ल्यांत राहत होते, जयकर पेंटर हेही पार्ल्यांत राहत होते, तरी बाबांचें पेंटिंग सांता-क्रूस येथेंच तयार होऊन शिर्डींत द्वारकामाईंत स्थापन झालें. जयकरानीं मेहन-तीचे बील केलें असतें तर ५०० रुपयेही मागूं शकते. पण त्यांनीं भक्ति

पूर्वक बाबाची सेवा ह्या दृष्टीनें तें तयार केलें व म्हणून तें चित्र एवढें मोहक उठलें. प्रधानांस तें पेंटिंग शिर्डींत दाखल होईपर्यंत जवळ जवळ १०० रु. खर्च झाला.

**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान**

# रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांजकडून लिहून आलेला मजकूर:—

## चातुर्मास्य यज्ञसत्रसमारंभ, नासिक

श्रीसमर्थ सेवा मंडळातर्फे, महाराज श्रीबाळकृष्ण यांनीं गेल्या चातुर्मास्यांत सिंहस्थ पर्वणीनिमित्त नासिक येथें सतत चार महिने यज्ञसत्रसमारंभ साजरा केला. तत्संबंधींची खुलासेवार हकीकत, संस्थेचे उद्देश, व संस्थेच्या इतर कार्याचें वृत्त असे सर्व विषय एकत्रित करून हा संक्षिप्त अहवाल नासिकचे डॉ. चंद्रगिरी यांनीं प्रसिद्ध केला आहे. झालेलें कार्य वैदिक कर्म मार्गाच्या दृष्टीनें उत्तेजनार्ह आहे यांत संशय नाहीं.

हें कार्य यशस्वी रीतीनें पूर्ण करून महाराज म्हणून लोकांत प्रसिद्धि मिळालेली व्यक्ति महाराज श्रीबाळकृष्ण हे पूर्वीचे श्री. बाबुराव ऊर्फ नारायण चिदंबर गाडगीळ होत, असें त्यांच्या छायाचित्रावरून आढळून येतें. आम्हास श्रीबाबांच्या लीलांचें व अघटित सामर्थ्याचें आश्चर्य वाटून किंचित काळ आम्ही थक्क झालों, हें नमूद केल्यावांचून आमच्याच्यानें राहवत नाहीं.

महाराज श्रीबाळकृष्ण हे कै. चिदंबरराव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांचे द्वितीय चिरंजीव आणि कै. चिदंबर केशव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ हे श्रीसाईबाबांच्या प्रथम भक्तांपैकीं एक निस्सीम भक्त होते, हें साईबाबांच्या बहुतेक भक्तमंडळास जाहीर असेलच. श्रीबाबांच्या निस्सीम भक्तांपैकीं एका भक्ताचा मुलगा महाराज म्हणून लोकांपुढें यावा ही बाबांचीच कृपा.

हे तरुण महाराज सन १९१६ साली बाबांच्या ह्यातींत बरेच दिवस शिरडीस होते. त्यानंतर सन १९१९ साली म्हणजे बाबांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या उत्सवास शिर्डीस आले होते. त्यानंतर बारा वर्षे गेलीं. शिरडीस हे या अवधींत आले नाहींत. १९३१ च्या आक्टोबरमध्यें श्रीबाबानीं या तरुण व होतकरू महाराजांना आपल्याकडे खेचलें आणि अश्विन शु॥ १० शके १८५३ या दिवशीं साक्षात दर्शन देऊन अनुग्रह केला व कार्याला परवानगी दिली.

यानंतर रा. बाबुराव गाडगीळ हे महाराज श्रीबाळकृष्ण या नांवानें नासिक, नगर, व मुखत्वें करून मुंबई शहरीं दारुण रोग बरे करतात, अशा प्रसिद्धीस चढत चालले आहेत. महाराजांचा हा लौकिक बडोदें, ग्वालेर, संस्थानापर्यंत पोचला आहे.

महाराजांना शिर्डी येथें जो साक्षात्कार झाला, त्यामुळेंच महाराजांचा पुढील कार्यक्रम द्रव्याची कांहीं अपेक्षा न करितां गायगरिबांचे दारुण रोग (कोड, दमा, काळपुळी, क्षय ) बरे करावयाचे ह्यांत जात आहे महाराजांच्या प्रयोगाचे अनुभव घेऊन प्रचीति आलेल्यांपैकीं मंडळींत मुंबईतील श्रीमंत शेट शांतिदास आसकरण, जे. पी., शेट जमनादास मोरारजी, जे. पी., बॅ. रुस्तूमजी आल्पाईवाला, मोरारजी आनंदजी टन्ना, बी., एल्‌एल्. बी. ए. अॅडव्होकेट; डॉ. काणे, एल्. एम्. ( ऑक्स्फोर्ड ) अशा व्यक्ति आहेत. आणि या व इतर लोकसमुदायाच्या साहाय्यानें नुक्तेच नाशिक येथें महाराजांनीं यज्ञयागादि कृत्यांत सुमारें १३,००० रुपये खर्च केल्याचें वर्तमान, नवाकाळ, केसरी, प्रभात, वगैरे पत्रांमधून प्रसिद्ध झालेंच आहे. आणि आमच्यापुढें असलेला समारंभाचा अहवालही ही गोष्ट विशेष रीतीनें आणि खुलासेवार सांगत आहे !

अहवालांत महाराज श्रीबाळकृष्ण यांचा आणि शिर्डीचा संबन्ध कार्याच्या दृष्टीनें आल्याचा उल्लेख असून मंडळाच्या मदतीसाठीं शिर्डीकरांनीं रु. १५ ची देणगी दिल्याचाही उल्लेख आहे. पण श्रीबाबांच्या अनुग्रहासंब-

न्धींची परिस्फुटता त्यांत केलेली नाहीं. यावरून आम्ही वर केलेलें श्रीबाबांच्या साक्षात्काराचें विधान थोडेंसें चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. पण ही गोष्ट महाराज श्रीबाळकृष्ण यांनीं समक्ष सांगितली असून त्या दिवशींची लिहिलेली डायरीही दाखविली. त्याचप्रमाणें बाळकृष्ण हें नांव श्री. केशव दत्त महाराज, संस्थान सोनगीर यांनीं दिलें असें अहवालांत नमूद केलें आहे. पण हें नांव निराळ्या तऱ्हेनें श्रीबाबांनीं सन १९१६ सालींच दिलें आहे, असें महाराज श्रीनीं समक्ष सांगून त्या सालच्या त्यांच्या वडिलांच्या हातच्या जमाखर्चाची नोंदही त्यांचे जवळ असून त्यांत पुढील उल्लेख आहे.

"रकम रु. २ श्रीबाबामहाराज यांनीं चि. बाबूस "ठकडया" म्हणून हाक मारून मागितल्यावरून चि. बाबूनें महाराजांना दिले."

या नोंदीवरून रा. बाबुरावांचें श्रीबाबांनीं "ठकडया" हें नांव ठेविलें होतें असें उघड होतें आणि "ठकडा" हें नांव बालमूर्ति श्रीकृष्णाचें आहे असें ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं "श्रीएकनाथचरित्रामध्यें" श्रीएकनाथांच्या पुढील पदाचा उल्लेख करतांना नमूद केले आहे:—

असा कसा देवांचा देव बाई **ठकडा** देव एका पायानें लंगडा ॥

असो. श्रीबाबांचा ठकडा आज महाराज श्रीबाळकृष्ण या नांवानें जगापुढें वावरतो आहे, हें निर्विवाद आहे. एवढेंच नाहीं तर वरील चमत्कारही ते श्रीबाबांच्या कृपेनेंच करूं शकतात हेंहीं खरें आहे.

महाराज श्रीबाळकृष्ण यांनीं समक्ष भेटींत पुढील कार्यक्रमासंबंधीं खुलासा करतांना मार्गशीर्ष शु॥ १५ ( श्रीदत्तजयंती ) शके १८५४ या दिवशीं त्यांना शिर्डी येथें श्रीबाबांनीं साक्षात दर्शन देऊन "मी सावली केली आहे. तिच्यांत बैस, इकड तिकड फिरूं नको" अशी आज्ञा केल्याचें सांगितलें. त्यामुळें त्यांचें सर्व लक्ष शीर्डीकडे ओढलें आहे व शीर्डीत राहून बाबांच्या कृपेनें जी कांहीं जनसेवा करतां येईल ती सर्व शिर्डी संस्थानच्या साह्यानें व पूर्ण देखरेखीखालीं करीत राहावी असा महारजांचा दृढ निश्चय आहे, असे साईलीलेंतून जाहीर करण्यास अत्यंत आनंद वाटणे साहजिक आहे.

गेल्या फाल्गुन शु॥ ६ (श्रीनाथषष्ठी) रोजीं महाराज श्रीक्षेत्र पैठण येथें गेले असतां श्रीबाबांनीं पुन्हा वरील दृष्टांताची आठवण करून दिली आणि "दुसऱ्यांचीं ओझीं आपण कशाला घ्यावीं?" अशी जाणीव करून दिल्यावरून, तेथून श्रीसमर्थ सेवामंडळाचे संरक्षक श्रीकेशव दत्तमहाराज, संस्थान सोनगीर; मंडळाचे व्यवस्थापक श्री. पु. त्री. क्षीरसागर, पुणे; व मंडळाचे चिटणीस श्री. मराठे नाशिक, यांस महाराजांनी एक पत्र पाठविले तें निराळें प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून संस्थेच्या कार्यासंबंधीं महाराज निवृत्त झाले आहेत असें दिसतें.

# बाबांची भिक्षा व न्याहरी

## श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

श्रीसाइलीला संपादक महाशय यांसः—

सप्रेम साष्टांग नमस्कार विनंती विशेष. खालील मजकुरास आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकीं कृपेनें स्थळ मिळावें अशी सविनय विज्ञप्ति आहे.

श्रीसाईलीलेच्या तृतीय वर्षाच्या नवमांकांत दिलेल्या ७७ बाबींपैकीं " बाबांची भिक्षा व न्याहरी " या सोळाव्या बाबीचें आज यथामति विवेचन करण्याचें योजिलें आहे.

उक्तंचः— अनुष्टुभवृत्त

**भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः ।**
**असंतो वाऽपि संतोवा । सोमपानं दिने दिने ॥**

अर्थः–शिजलेलें, भाजलेलें, किंवा उकडलेलें भिक्षान्न खाणारा ब्राह्मण भोजन करूनही निराहारच करतो, त्याचें तें भिक्षान्न प्रतिग्रह किंवा दान होत नाहीं. भल्याबुऱ्या कोणत्याही ज्ञातीच्या स्त्रीपुरुषाकडून कोरान्न किंवा आमान्न ( कोरडी भिक्षा ) भिक्षा घेऊन ती स्वतः शिजवून जो भोजन करतो तो नित्य अमृतपानच करतो.

भिक्षा मागण्याची चाल अत्यंत पुरातन असून, इह लोकांतील ज्ञात असलेल्या सर्व देशांत हल्लींही ती भिन्न भिन्न स्वरूपांत अस्तित्वांत असल्याचें दिसून येतें व भिक्षा मागणारीं माणसें, सर्व धर्मात व सर्व जातींत सर्व जगभर पसरलेली आढळून येतात.

भिक्षेचीं नांवें, स्वरूपें, तज्जन्य निर्माण होणारीं अथवा तिच्यावर चालणारीं कार्यें किंवा संस्था, व ती मागण्याचे हेतु हे मात्र फार निरनिराळे

असतात. भिक्षेचे महत्त्व, गौणत्व, किंवा नीचत्व भिक्षा मागणाऱ्या विभूतींच्या हेतूवर, वर्तनावर व कर्तव्यशक्तीवर अवलंबून असतें.

इतर देशाच्या मानानें पाहतां आपल्या या भरतभूमींत परिस्थित्यनुरूप भिक्षा मागणारांची संख्या फार दृष्टीस पडते.

भिक्षा मागणें ही आमची जहागीर आहे, किंवा तो आपला जन्मसिद्ध हक्क आहे, अशी जी आपल्या देशांतील कांहीं विशिष्ट जातींतील लोकांची समजूत आहे, ती निवळ असत्य व भ्रममूलक असून वेडेपणाची, कर्तव्यशून्यतेची व आलस्योत्पादनाची आहे.

भिक्षा मागण्याची पद्धत वेदकालापासून आहे याबद्दल हिंदुस्थानांतील, सर्व जगांत अग्र पूजेचा मान असणाऱ्या गीर्वाण भाषेंतील उपनिषदादि देदीप्यमान ग्रंथरत्नांशीं ज्यांचा नित्य परिचय आहे अशा, रसिक, मार्मिक, बुद्धिमान विद्याव्यासंगी विद्वानांत दुमत असण्याचें कारण नाहीं.

सर्व भिक्षा श्रुतिसंमत नाहीं. कांहीं श्रुतिसंमत, कांहीं स्मृतिसंमत, कांहीं जनसंमत, व कांहीं स्वैरस्वेच्छा संमत, असे तिचे निरनिराळे प्रकार सर्व देशांत पाहावयास मिळतील असें मात्र नाहीं. पण ते सर्व हिंदुस्थानांत मात्र पाहावयास मिळतात.

श्रुतिसंमत भिक्षा अत्यंत उच्च कोटींतील व परमोदात्त हेतूची मनिली आहे. स्मृतिसंमत दुसऱ्या कोटीची, जनसंमत तिसऱ्या कोटीची व स्वैरस्वेच्छासंमत अत्यंत नीच कोटीची म्हणून गणली गेली आहे.

भिक्षा ओली व कोरडी याच दोन स्वरूपाची असते. ओल्या भिक्षेंत फक्त शिजविलेलेंच अन्न येतें. कोरान्न, आमान्य किंवा कोरड्या भिक्षेंत शिजविलेल्या अन्नाशिवाय, धन, धान्य, पशु, भू, वस्त्रालंकारादि यच्चयावत् वस्तूंचा समावेश होतो. पहिली फार तर १२ ते २४ तास टिकते व तिचा संग्रहही तितकाच काल केला जातो. दुसरी वाटेल तितका काळ टिकते व तिचा संग्रहही दीर्घकाल केला जातो. पहिलीचे उपासक थोडे. दुसरीचे असंख्य.

गीर्वाण व मराठी वाङ्मयांत "भिक्षा, अभिशस्ति, यांचा, याचना अर्थना प्रार्थना" वगैरे भिक्षेचीं नांवें सांपडतात. अलीकडील सुधारणाकाळांत तिलाच (Contribution, Subscription Fund, Donation) अंशदान, वर्गणी, निधि, देणगी वगैरे गोंडस नांवें दिलीं आहेत.

निस्पृह, ब्रह्मनिष्ठ, वैराग्यशील, ज्ञानसंपन्न, आत्मविद् पुरुष ओली भिक्षा मागतात. ती स्वार्थाकरतां किंवा परमार्थाकरतां नव्हे. केवळ लोकसंग्रहासाठीं, शरीराचें जरूर तितकें संरक्षण व्हावें म्हणून ही भिक्षा श्रुतिसंमत, अत्युच्च कोटींतील उदात्त हेतूची व अव्वल दर्जाची होय.

यति, व्रती, तपी, ब्रह्मचारी, विद्यार्थी, अतिथि इत्यादि पुरुषांनीं मागितलेली भिक्षा श्रुति व स्मृतिसंमत आहे. ही बहुधा ओलीच असते.

दिसण्यांत छळक पण तत्वतः सत्वपरीक्षकबुद्धीनें मागितलेली भिक्षा स्मृतिसमंत दिसते. उदाहरणार्थ, वामनावतार परमात्मा व सत्वशील बलिराजा, ऋषिपुंगव दुर्वास व सत्यनिष्ठ राजा हरिश्चंद्र, त्रिगुणावतार ब्रह्मा, विष्णु, महेश व ऋषिशार्दूल अत्रिसुंदरी श्रीअनसूयामाता—

आंधळे, पांगळे, लंगडे, लुळे, थोटे, मुके, बहिरे, रोगी, अशक्त दरिद्री वगैरेंनीं मागितलेली भिक्षा स्मृतिसंमत दिसते.

लोकोपयोगी, परोपकारी, सार्वजनिक व धार्मिक कार्यें व संस्था याकरितां मागितलेली भिक्षा ही स्मृतिसंमत व जनसंमत आहे.

निबळ, लट्ठामिश्र, आळशी, चंदुलाल, केवळ स्वतःच्या चैनीकरितां व आपल्या रांडापोरांची भर करण्याकरितां जी भिक्षा मागतात ती अत्यंत नीच कोटींतील असून स्वैरस्वेच्छासंमत अतएव त्याज्य, तिरस्काराई व निरयदायिनी आहे. ती त्या व्यक्तीखेरीज इतर कोणासच संमत नाहीं.

हें भिक्षेचें सामान्य स्वरूप झालें. आतां बाबा भिक्षा कां मागत असत व त्यांची भिक्षा उपरिनिर्दिष्ट भिक्षाप्रकारांपैकीं कोणत्या प्रकारांत येते याचा विचार करावयाचा आहे.

ज्ञानमकरंदांनीं ओथंबलेल्या उदार दशोपनिषत्कमलकुसुमरत्नापैकीं बृहदारण्यकोपनिषदांतील तृतीयाध्यायाच्या पंचम ब्राम्हणाच्या पहिले, दुसरे व तिसरे मंत्रांतील ऋषिवर्य कहोल व ब्रम्हनिष्ठ याज्ञवल्क्य यांच्या प्रश्नोत्तरतां वरील प्रश्नाचा निर्णय आहे असें मला वाटतें. ते मंत्र खालीं देतों.

" अथ हैनं कहोल: कौषीतकेय: पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच, यदेव साक्षादपरोक्षाद्ब्रम्ह य आत्मा सर्वांतरस्तं मे व्याचक्ष्वेत्येषत आत्मा सर्वांतर:॥ १॥

अर्थ:—त्यानंतर याज्ञवल्क्याना, कहोल कौशितके यांनी प्रश्न विचारला, " हे याज्ञवल्क्या, जें साक्षात् अपरोक्षब्रम्ह, जो आत्मा सर्वांतर तो मला स्पष्टपणें सांगा. " याज्ञवल्क्य म्हणाले " हा तुझा आत्मा सर्वांतर आहे. "

" कतमो याज्ञवाल्क्य सर्वांतरो योऽशनाय पिपासे
शोकं मोहं जरां मृत्युमेत्येति " ॥ २ ॥

अर्थ:—कहोल म्हणाले " हे याज्ञवल्क्या, तो सर्वांतर कोणता ? " याज्ञवल्क्य म्हणाले " जो भूक तहान, शोक, मोह, जरा व मृत्यु यांचे उल्लंघन करतो तो सर्वांतर आत्मा होय."

" एतं वै तमात्मानं विदित्वा ब्राह्मणा: पुत्रैषणाश्च, वित्तैषणाश्च लोकैषणाश्च, व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरंति ॥ ३ ॥

अर्थ:—त्याच या आत्म्याला जाणून ब्राह्मण, पुत्रैषणेपासून वित्तैषणेपासून व लोकैषणेपासून ( एषणा—इच्छा ) व्युत्थान पावून ( पराङ्मुख होऊन ) नंतर भिक्षाचरण करतात. हा व्युत्थानाधिकार ब्राह्मणांचाच आहे. तत्ववेत्ते ब्राह्मण, कर्मापासून व यज्ञोपवीतादि कर्मसाधनापासून व्युत्थान पावून परमहंस परिव्राज्य स्वीकारून भिक्षाचर्य करतात. हें भिक्षाचर्य म्हणजे प्रतिग्रह किंवा दान नाहीं. हा भिक्षेचा अधिकार लहानसहान नव्हे.

बाबांना जो भिक्षेचा अधिकार प्राप्त झाला होता तो त्यांनीं सर्वांतर परमात्म्याला पूर्णपणें जाणून, वित्तैषणा, दारैषणा, पुत्रैषणा, व लोकैषणा यांचा सर्वस्वी त्याग करून, कर्म व कर्मसाधनापासून पराङ्मुख होऊन, परमहंस परिव्राज्य स्वीकारल्यामुळेंच.

बाबा पूर्ण ब्रह्मनिष्ठ होते म्हणूनच ते भिक्षा मागत असत. त्यांचा भिक्षाधिकार पूर्ण श्रुतिसंमत असून अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा होता, हें यावरून कळून येईल. ते ओली भिक्षा मागत व तिचा कधीं ही २--३ तासापेक्षा जास्त परिग्रह करीत नसत. ते ब्राह्मण होते.

श्री समर्थ सद्गुरु रामदास स्वामीमहाराज यांनींही आपल्या श्री. दासबोध ग्रंथातील १४ वे शतकाच्या दुसरे दशकांत या भिक्षेचें, तिच्य- स्वरूपाचें, अधिकाराचें व तिच्यापासून होणाऱ्या अत्यंत श्रेष्ठ परिणामाचें आपल्या ओजस्वी, चटकदार व रसाळ वाणीनें गोड व सुंदर वर्णन केलें आहे. यांतही मुख्यत्वें करून भिक्षा ब्राह्मणांनींच मागितली पाहिजे असें आहे. पण येथेंही ब्राह्मण या शब्दाचा अर्थ उपरिनिर्दिष्ट बृहदारण्यकोपनि- षदाच्या मंत्रांत दिलेल्या ब्राह्मण शब्दासारखाच विवक्षित आहे.

समर्थ लिहितात, भिक्षा ही परमात्माला मान्य आहे. ज्याचा अगाध महिमा तो परमात्माही भिक्षा मागतो. परमात्मरूप श्रीदत्त, श्रीगोरक्ष आदिकरून सिद्ध महात्मे जगतितलावर भिक्षा मागतात. स्वत: समर्थही भिक्षाच मागत असत.

वार लावून जेवणें किंवा नित्यावळीचा ब्राह्मण म्हणून जेवणें ही भिक्षा खरी; पण तिच्यांत स्वातंत्र्य नाहीं; म्हणजे ही हीन दर्जाची भिक्षा होय.

भिक्षेमुळें स्वातंत्र्य, व महत्त्व प्रकट होऊन ईश्वरप्राप्ती होते. भिक्षा मागतां ओरडूं नये, लाजूं नये व थकूं नये.

भिक्षा ही कामधेनू आहे. तिचें फल सामान्य नव्हे. तिचा जो अनादर करील तो कपाळ करंटा दुर्दैवी समजावा.

भिक्षेंत दुसऱ्या दिवसाचा सुद्धा परिग्रह नसल्यामुळें भिक्षा मागणारा ब्राह्मण निरंतर निर्भय असतो.

भिक्षा मागण्यास कोणाचीच हरकत नसते.

भिक्षा मागण्यांत गेलेला वेळ सार्थकीं लागतो.

वासी आनंदे ॥ ४८ ॥ किंवा पाहून निशावर । जैसा आनंदे चकोर । वा पाहून जलधर । शिखंडी ते केकावती ॥ ४९ ॥ महाराजांसी आनंद तैसा । झाला तेधवां परियेसा । सच्चिदानंद चिद्विकासा । नयनीं पाहतां श्रोते हो ॥ ५० ॥ त्या पंढरपूर क्षेत्रांत । जळोमळोजी नामें भक्त । समर्थानीं केला मुक्त । चमत्कार दावुनी ॥५१ ॥ ती येथें अवघी कथा । साफल्य श्रोते सांगूं जातां । विस्तार होऊन ग्रंथा । सागराकार वाढेल ॥ ५२ ॥ सांग करूनिया वारी । महाराज परतले खंदारीं । गोष्ट अद्भुत मध्यंतरी । घडली असे ती ऐका ॥ ५३ ॥ एके गांवीं मुक्कामास । साधुमहाराज मध्यान्हास । उतरले आरंभ स्वैंपाकास । झाला असे ते ठायीं ॥५४॥ पूजा वैश्वदेव झाला । नैवेद्य पांडुरंगाला । दावून काकबलीला । टाकिते झाले महाराज ॥ ५५ ॥ तों तेथें जवळची । मंडळी लिंगाईत वाण्याची । उतरली होती तेधवां साची । ते बोलिले विनोदानें ॥ ५६ ॥ आम्हास येऊं द्या जेवा-वया । त्वरा न करा ऐसी वायां । शेजाऱ्यांसी टाकूनिया । सुज्ञें भोजन करूं नये ॥५७॥ ऐसें ऐकितां तद्भाषण । महाराज बोलले मधुर वचन । जा शीघ्र करा स्नान । पानें तयार असती ॥ ५८ ॥ तुम्हांप्रती टाकून । आम्ही न करूं भोजन । तुमचा तोच आमुचा प्राण । अवघे आहों एकरूप ॥ ५९ ॥ चला महाराज त्वरीं । येऊन बसा पात्रावरी । ऐसी ऐकितां वैखरी । वाणी बोलूं लागले ॥ ६० ॥ आम्ही आहों लिंगाईत । तुम्ही टाळकुटे विष्णुभक्त । तुमचें अन्न आम्हांप्रत । न चालेचि जेवावया ॥ ६१ ॥ लिंग नाहीं ज्याच्या गळां । तो मांगाहून आगळा । त्याचा न व्हावा विटाळ । वदन त्याचें पाहूं नये । ६२ ॥ ऐसी ऐकून गर्वोक्ति । साधुमहाराज त्यांप्रती । सविनय निश्चिती । बोलते झाले तें ऐका ॥६३॥ तुमचें भाषण प्रमाण । जें स्थान लिंगावांचून । असेल तें

त्यागून । सुज्ञें सावध असावें ॥ ६४ ॥ शिवलिंगावीण कांहीं । जगत्रयांत वस्तु नाहीं । तोच नटला सर्वांठायीं । आपुलिया इच्छेनें ॥ ६५ ॥ जीवशिव एकरूप । येथें न मानावा विकल्प । माझा विठ्ठल मायबाप । न त्याहून निराळा ॥ ६६ ॥ तोच विरिंची कमलासन । तोच श्रीहरि राजीवनयन । तोच शंकर उमारमण । भेद येथें मानूं नका ॥ ६७ ॥ शिव विष्णूचा करिती द्वेष । ते जाति रौरवास । या विठूचे प्रसादास । नाहीं ऐसें म्हणूं नका ॥ ६८ ॥ गोपसंगें हा श्रीहरी । जेव्हां जेवला यमुनातीरीं । तें उच्छिष्ट सेवण्यापरी । मासे झाले इंद्रादिक ॥ ६९ ॥ तें न मानिती वाणी परी । आम्ही न जेऊं निर्धारीं । तुमचें अन्न गेलिया उदरीं । आम्ही बाटूं निश्चयें ॥ ७० ॥ साधुमहाराज नंतर । बोलते झाले जोडोन कर । आपुली मर्जी इतुक्यावर । मर्जी असेल तर करा ॥७१॥ कोरडा शिधा येथून न्यावा । स्वैंपाक करुनियां जेवा । तेणें माझ्या पंढरीरावा । संतोष होईल निश्चयें ॥७२॥ वाणीज म्हणती ते अवसरीं । आम्ही नाहींत भिकारी ॥ शिधा तुमचा निर्धारीं । नको आह्मां कारणें ॥ ७३ ॥ प्रसाद खडीसाखरेचा तरी । घ्या हो सज्जन आपुले करीं । अव्हेर करितां श्रीहरी । कोपेल कीं निरर्थक ॥७४॥ परी न तें वाणियांच्या येई मना । म्हणून कोप नारायणा । ऐसा झाला तेधवां जाणा । भक्त अपमान न साहे ॥ ७५ ॥ आराध्यदैवत त्याचें संत । संत गळ्याचे ताईत । संत प्राण साक्षात । वाटे हरीतें आपुला ॥ ७६ ॥ संताची ती करितां सेवा । हर्ष वाटे रमाधवा । खासदार झाला बरवा । अर्जुनाचा श्रीकृष्ण ॥७७॥ पादरक्षा कक्षेंत । घेऊन द्रौपदीच्या रमानाथ । गडी होवोनियां सत्य । भीष्मशिबिरा पातला ॥७८॥ जनीचें दळितां दळण । नच लाजे नारायण । काननासी जाऊन । शुभ्र वेंची जनींसंगें ॥ ७९ ॥ पैठणांत गोदातीरीं । पाणक्या झाला मुरारी । श्रीएकनाथाचिये दारीं । पाणी वाहिलें

स्कंधावर ॥ ८० ॥ परी भक्तांस अव्हरितां । वा दुरुत्तरें त्यां ताडितां । किंवा त्यांसी गांजितां । कोपतसे घननीळ ॥ ८१ ॥ असो ऐसे दृष्टांत देतां । निरर्थक वाढेल कथा । मुख्य गोष्ट सांगतों आतां । तुह्मां श्रोते ये ठायीं ॥ ८२ ॥ अग्नीस करून पाचारण । आज्ञा करी जगज्जीवन । अभक्तांचीं दिंड जाण । जाऊन जाळी अवघीं ॥ ८३ ॥ ते वाणी मदोन्मत्त । निंदिलें माझ्या भक्ताप्रत । त्याचें उसनें घेणें सत्य । त्वां जाऊन वैश्वानरा ॥८४॥ मग तेथें कशाचा उशीर । दिंडा जाळी वैश्वानर । वाणी झाले चिंतातुर । तो प्रकार पाहूनियां ॥ ८५ ॥ कोणी करिती शंखध्वनी । कोणी ओतिती आणून पाणी । परी कांहीं केल्या न शमे अग्नी । उग्र रूप धरिलें पहा ॥ ८६ ॥ वाणी अवघे शोक करिती । आह्मी झालों ठार ह्मणती । देवा पाय पोटावरती । कैसा दिलास अग्निरूपें ॥ ८७ ॥ कापड वीस हजारांचें । उंची रेशमी जरतारीचें । परी तें अवघें अग्नीचे । पडलें आज मुखीं कीं ॥ ८८ ॥ जों जों अधिक घालावें जीवन । तों तों अधिक भडके त्रिचरण । जीवनाचे अंगीं गुण । आले न घृताचे ऐकिलें ॥ ८९ ॥ त्या वाण्याच्या मंडळींत । एक होता जरठ सत्य । तो म्हणे अवघ्यांप्रत । मर्शी उमगलें हें कोडें ॥ ९० ॥ श्रीहरीच्या प्रसादाचा । आपण केला अव्हेर साचा । म्हणून प्रकार दिंडाचा । झाला असे ये ठायीं ॥ ९१ ॥ आतां टाकून अभिमान । त्या साधूस जाऊं शरण । शरणागता न देती मरण । ऐसे संत दयाळू ॥ ९२ ॥ तें मानलें अवघ्यांस । शरण आले समर्थास । घट्ट धरून पदास । बोलूं लागले दीनवचें ॥ ९३ ॥ हे साधु महाराज कृपावंता । आतां न अंत पाहीं वृथा । बाळावर न कोपे माता । जरी अपराधी असे तें ॥ ९४ ॥ आम्ही दीन दीन मंदमती । तूं कृपासमुद्र उदार मूर्ति । तुझें चित्त भागिरथी । भूतदयेचा पुतळा तूं ॥ ९५ ॥

चंद्रास निंदितां खळजन । काय तो टाकी शीतपण । सुरभीस करतां ताडण । ती न सोडी स्वस्वभावा ॥ ९६ ॥ आमुचें अपराधरूपी अवघें तृण । जाळी कृपाकृशानें करून । आम्ही झालों अतिदीन । रक्षीं रक्षीं मायबापा ॥ ९७ ॥ महाराज म्हणती त्यावरी । चिंता न करा रे अंतरीं । होतील दिंडें पहिल्यापरी । श्रीहरीच्या । कृपेनें ॥ ९८ ॥ हें घ्या श्रीहरीचें चरणतीर्थ । टाका दिंडावरी त्वरित । तेणें तो सप्त हस्त । शांत होईल निश्चयें ॥ ९९ ॥ मागें जगमित्र नागासी । रक्षिता झाला हृषीकेशी । अग्नि लागतां सदनासी । बाधा न त्याची झाली तया ॥ १०० ॥ तोच प्रकार होईल येथ । शोक न करा रे किंचित । बस्ते जळाले आहेत । डाग न आंतील कापडासी ॥ १०१ ॥ असा तीर्थ घेउनियां करीं । वाणी शिंपिती दिंडावरी । थेंब पडतां आग सारी । शांत झाली तात्काळ ॥ १०२ ॥ अवघा माल शाबूत । होता बस्त्यांत सुरक्षित । तें पाहून अवघ्यांप्रत । आश्चर्य झालें तधवां ॥ १०३ ॥ वाणी करिती जयजयकार । मुखें स्तवन अपार । करूनियां वारंवार । पदीं घालिती लोटांगणें ॥ १०४ ॥ समर्थाचे पंक्तीचा । घेते झाले प्रसाद साचा । टाकून अभिमान जातीचा । म्हणती श्रेष्ठ विष्णुभक्त ॥ १०५ ॥ वैष्णवांची न पहावी जात । ते अवघे पंढरीनाथ । जैसा दोष सागराप्रत । नाहीं बोलिला शास्त्रांतरीं ॥ १०६ ॥ तीच आहे येथें स्थिति । संत केवळ रमापती । साधुमहाराज तेथून पुढती । निघते झाले ग्रामाकडे ॥ १०७ ॥ खंदारचें सानिध्य । मन्याड नामें नदी प्रसिद्ध । तेथें शेकापुरीं अगाध । गोष्ट घडली तें ऐका ॥ १०८ ॥ त्या मन्याड नदीचे तीरीं । समर्थांची पातली स्वारी । संकष्टी चतुर्थी साजिरी । होती श्रोते त्या दिनीं ॥ १०९ ॥ बरोबरीच्या मंडळींत । एक होता गाणपत्य । चतुर्थीचें होतें व्रत । त्या गणेशभक्तातें ॥ ११० ॥ त्या चतुर्थीचे दिवशीं । कीर्तन

टरलें रात्रीसी ॥ शेकापुराचे सांनिध्यासी । पटांगणांत रानामध्यें ॥ १११ ॥ भक्तमंडळी भाविक । त्यांनीं केला थाट देख । दीप लाविले असंख्य । केल्या बिछायती नानापरी ॥ ११२ ॥ अस्तमानाचे समयासी । आरंभ झाला कीर्तनासी । होतां एक प्रहरनिशी । चिंतावला तो गाणपत्य ॥ ११३ ॥ चंद्रोदयाची आली वेळा । कीर्तनासी रंग भरला । चंद्रप्रभेनें प्राचीला । शोभा आली विशेष ॥ ११४ ॥ तैं तो ह्मणे गाणपत्य । आजी नेम चुकतो खचित । उगीच कीर्तना आलों येथ । ब्रह्मचऱ्हाट ऐकावया ॥ ११५ ॥ हरिभक्तांचा करितां संग । कर्म न घडे कदा सांगा । गजाननाची प्राप्ति मग । नच होई सर्वथा ॥ ११६ ॥ कर्ममार्गा देण्या फांटा । यांनीं निर्मिल्या भक्तिवाटा । उपदेश करूनियां खोटा । वेदमार्गा बुडविती ॥ ११७ ॥ यांसी नावडे यागयजन । तैसींच व्रतें उद्यापन । ह्मणती अखंड करा भजन । टाळ घेऊन हातामध्यें ॥ ११८ ॥ निर्लज्ज होऊन नाचती । अवघा एक रमापती । भूतमात्रा नम्र होती । समान मानिती सर्वांला ॥ ११९ ॥ पुरें झालें हें कीर्तन । केलें पाहिजे मज स्नान । अथर्वशीर्षें गजानन । पूजिला पाहिजे ये वेळां ॥ १२० ॥ ऐसें बोलोन निघाला । कीर्तनाचा अव्हेर केला । जैसा गर्दभ शर्करेला । हुंगोनि जाय पलीकडे ॥ १२१ ॥ टाकून त्या कीर्तनाप्रती । पूजावया निघे माती । जैसे काक मानसाप्रती । त्यजून जाती डबक्याकडे ॥ १२२ ॥ असो विव्हाडीं जातां त्याप्रत । भेटते झाले मार्गांत । मयूरेश्वर गणनाथ उपास्य दैवत तयाचें ॥ १२३ ॥ तो चतुर्भुज गजानन । अंगीं सिंदुराचें भूषण । रत्नमुकुट देदिप्यमान । शिरीं ज्याच्या झळाळे ॥ १२४ ॥ गंडस्थळीं दूर्वांकुर । फरशानें मंडित कर । कटीं कसिला पीतांबर । विद्युल्लतेचेपरी जो ॥ १२५ ॥ पायीं घागऱ्या शोभती । रुणझुणझुण शब्द करिती । पंख्यापरी हालताती । कर्ण जया प्रभूचे ॥ १२६ ॥

ऐसें देखोनि गणनाथ। ब्राह्मण घाली दंडवत। जोडोनिया दोन्ही हात। स्तवन करी प्रभूचें ॥ १२७ ॥ परि न करितां भाषण। चालूं लागले गजानन। जैसें याचका पाहून। कृपण होय पाठमोरा ॥ १२८ ॥ ब्राह्मण म्हणे गणनाथा। सिंदुरारे जगताता। कां हो मसीं अव्हेरितां। भक्त-निर्वाण मी असें ॥१२९॥ त्यावरी बोले गणपती। भाषण कराया तुज-प्रती। वेळ मशीं निश्चितीं। नाहीं जाण ये वेळां ॥१३०॥ मीं जातों कीर्त-नास। साधुमहाराज पुण्यपुरुष। गातसे श्रीहरीच्या लीलेस। काननीं तें ऐकावया ॥ १३१ ॥ हरिनामाचा जेथ गजर। तेथें राबे शारंगधर। वैकुंठीं न वसे तिळभर। वेडा होत कीर्तनीं ॥ १३२ ॥ सहस्त्र योग केले जरी। वा व्रतोद्यापनें नानापरी। परी कीर्तनाची न ये सरी। कलियुगांत द्विजवरा ॥ १३३ ॥ नाममहिमा कलींत। श्रेष्ठ आहे अव-द्यांत। शिळा रामनामांकित। तरल्या जाण सागरीं ॥ १३४ ॥ नामें तरला अजामीळ। महापापी दुर्जन खळ। नामेंच भेटला गोपाळ। उद्ध-वासी जाण पां ॥ १३५ ॥ दाह भगवान शंकराचा। नामेंच निवाला जाण साचा। महिमा हरीच्या नामाचा। शेषही वर्णूं शकेना ॥ १३६ ॥ तूं तें कीर्तन सोडोनि। उगाच आलास तेथोनी। मरण ज्याचें सन्निध जाणी। त्यासी काढा नावडे ॥ १३७ ॥ गजाननाचें भाषण। ऐकतां द्विज झाला खिन्न। चालूं लागला मागून। त्या दयाघन प्रभूच्या ॥१३८॥ कीर्तनीं आले गणनाथ। बैसले येऊन सभेंत। साधुमहाराज महाभक्त। उभा कीर्तना म्हणूनि ॥ १३९॥ लंबोदरासी पाहतां। महाराज आनंदले तत्वतां। साष्टांग करून दंडवता। धन्य म्हणती दिवस हा ॥ १४० ॥ देखीले तुझे दिव्य चरण। तेणें झालों धन्य धन्य। हा देह ओंवाळून। टाकीन देवा तुजवरुनी ॥ १४१ ॥ पाडसासी भेटे हरिणी। वा कामुकातें कामिनी। वा मृत्युसमयीं येवोनी। अमृत पडावें मुखांत ॥१४२॥

तैसें झालें आज मला। सिद्ध दाता भेटला। कीर्तनाचें फळ मला। येथेंच मिळालें निश्चयें ॥ १४३ ॥ कीर्तन झालें रात्रभर। दिशा उजळल्या सभोंवार। मग बोलला मयूरेश्वर। आतां कीर्तन आटोपीं ॥१४४॥ स्नानसंध्येची वेळ झाली ॥ पाहिजे अर्घ्यवेळा साधिली। येऊं लागला उदयाचळीं। सहस्ररश्मी नारायण ॥ १४५ ॥ कुकुटाचे होती स्वन। तमानें केलें पलायन। मंदगतीनें समीरण। प्रभातींचा वाहे हा ॥ १४६ ॥ द्विजवराचें शरीर। कर्ममार्ग हें साचार। परी तेथें पाहिजे रुधिर। सद्भक्तीचें जाण पां ॥ १४७ ॥ रुधिरावांचून देहाची ॥ किंमत नोहे जगीं साची। रक्तासही देहाची। आहे अपेक्षा मोलास्तव ॥१४८॥ रुधिरयुक्त शरीरांत। प्राण जैसा असे रहात। तोच प्रकार आहे येथ। हें कल्पांतीं विसरूं नको ॥ १४९ ॥ कर्मयुक्त सद्भक्ति। जेथें तेथेंच रमापती। यांत फूट होतां निश्चिती। दुरावतो रे परमात्मा ॥ १५० ॥ असो गजाननाचे आज्ञेनी। कीर्तन आटोपलें समर्थांनी। कीर्तन प्रसाद वांटोनी। श्रोते वाटेस लाविले ॥ १५१ ॥ मन्याडीचें करून स्नान। सूर्यास अर्घ्य देऊन। सांग पूजिला गजानन। षोडशोपचारें करून ॥ १५२ आणिक मागितला वर। आपण असावें निरंतर। ये ठायीं हे मयुरेश्वर। इतुकें द्यावें मजलागीं ॥ १५३ ऐसी ऐकितां भक्तवाणी। बोलता झाला फरशपाणी। पाषाण प्रतिमा ये स्थानीं। करूनी माझी स्थापावी ॥१५४॥ मी वसेन निरंतर। तुझ्यास्तव या पासवर। अष्टविनायकांहून थोर। हें स्थान होईल ॥ १५५ ॥ येथें करितां अनुष्ठान। मी पावेन गजानन। विघ्नसंकटें हरोन। इच्छिलें फल देईन त्या ॥ १५६ ॥ ऐसें बोलोन समर्थांप्रती। गुप्त झाले गणपती। महाराजांनीं पाषाणमूर्ती। तेथें स्थापिली तात्काळ ॥ १५७ ॥ अजूनपर्यंत तें स्थान। आहे मन्याडकांठीं जाण। जे जे कोणी भाविक जन। ते ते जाती दर्शना

॥ १५८ ॥ तेथून महाराज खंदारीं। येते झाले सत्वरा। आनंदल्या नरनारी। महाराजांसीं पाहून ॥ १५९ ॥ खंदारीं अवलिया यवन। मौलीसाहेब ह्मणून। होते एक त्यांसी पूर्ण। स्नेह असे समर्थाचा ॥ १६० ॥ बैसूनियां एकांतीं। दोघे ब्रह्मचर्चा करिती। एकमेकां न विसंबती। चांदणें चंद्रासमान ॥ १६१ ॥ कांहीं दिवस राहून तेथें। महाराज निघाले माहुरातें। भेटण्या श्रीदत्तातें। आपुल्या उपास्य दैवता ॥ १६२ ॥ मार्गीं जातां कांकडीसी। मुक्काम झाला परियेसी। तेथील अवघे ग्रामवासी। शरण आले महाराजां ॥ १६३ ॥ या गांवीं जलावीण। त्राही त्राही आम्ही जन। विहिरी बहुत खोदोन। पाहिल्यावरी न लागे जल ॥ १६४ ॥ काम एका वापीचें। हल्लीं आहे सुरू साचें। गर्दाड सहा पुरुषांचें। खालीं गेलें दयाळा ॥ १६५ ॥ ऐसें ऐकितां सद्गुरुनाथ। उतरले तात्काळ विहिरींत। पहार घेऊन हातांत। पूर्वअंगासि खोदिलें ॥ १६६ ॥ खोदितां बोलले गुरुमूर्ति। हे गौतम गंगे भागीरथी। येथें प्रगटावें निश्चितीं। जन न मारा जलाविण ॥ १६७ ॥ ऐसी निघतां संतवाणी। जळ आलें छिद्रांतुनीं। अजूनपर्यंत त्या स्थानीं। दुष्काळ नाहीं जळाचा ॥ १६८ ॥ पुढें माहुराचे मार्गांत। तस्करें गांठिलें काननांत। दटावून स्वामीप्रत। बोलूं लागले स्तेन ते ॥ १६९ ॥ काय आहे तुजपाशीं। तें देई जे आम्हांसी। ना तरी तुझ्या प्राणासी। हरण करूं ये स्थानीं ॥ १७० ॥ महाराज म्हणती ते वेळां। पताक चिपळ्या टाळ माळा। हीच संपत्ति सोज्वळा। आहे बाप हो मजपाशीं ॥ १७१ ॥ श्रीहरीचें नामस्मरण। हेंच आहे माझें धन्य। त्याची अपेक्षा तुम्हा कारण। असल्या या हो भजन करूं ॥ १७२ ॥ ऐसें ऐकतां बोलणें। तस्कर वदती हास्यवदनें। बरेंच ढोंग आणिलें यानें। साधुपणाचें येवेळीं ॥ १७२ ॥ त्यानें न आम्ही-

फसणार । ऐसे प्रसंग वरचेवर । येती आम्हा साचार । म्हणून चाळे करूं नको ॥ १७४ ॥ महाराज म्हणती वाहतो शपथ । मजपाशीं न द्रव्य किंचित । मागून माझा येतसे सुत । त्यापाशीं असे घ्या ॥ १७५ ॥ तस्करें घेऊन झाडच्याला । सोडोनि दिधलें समर्थाला । बसले अवघे पाळतीला । मागच्या मंडळी कारणें ॥ १७६ ॥ तोंच दहापांच मंडळी । येतां दृष्टी पाडिली । चित्तवृत्ति आनंदली । तस्करांची तेधवां ॥१७७॥ उभयतांची मारामारी । झाली तेव्हां कांतारीं । जखमी होऊन भूमिवरी । लोळूं लागले स्तेन ते ॥ १७८ ॥ समर्थ पुत्र भास्करपंत । गेला दुहूं मंडळीसहित । महाराजांसी वृत्तांत । सर्व त्यांनीं कळविला ॥ १७९ ॥ महाराज ऐकून पुत्र बोला ॥ ८ ॥ म्हणती धिक्कार असो तुला । धरून अन्नाच्या लोभाला । कां रे मारिलें तस्करांसी ॥ १८० ॥ ते स्तेन महा थोर । ईश्वराचे अंश साचार । त्यां मारण्या तुझा कर । कैसा धजला चांडाळा ॥ १८१ ॥ त्यांचा घेण्या समाचार । महाराज परतले सत्वर । जेथें घायाळ होऊन चोर । घुमत होते भूभागीं ॥ १८२॥ जखमा पाहून तयाच्या । तो दयासमुद्र दीनांचा । विव्हळ झाला मनीं साचा । याचें नांव भूतदया ॥ १८३ ॥ करून औषधोपचारासी । बरें केलें तस्करांसी । आपण राहिले शुश्रूषेसी । काननीं त्या चोरांच्या ॥१८४॥ तो पाहून प्रकार । चोरही आले शुद्धीवर । सत्समागम होतां थोर । देहभान पालटला ॥ १८५ ॥ संयोग होतां कस्तुरीसी । मृत्तिका चढे मोलासी । लोह झगडतां परिसासीं । सोहपण जातसे ॥ १८६ ॥ त्या चोरांचा नाईक । नवसाजी नामें होता देख । तो स्वामींचा सेवक । झाला उपदेश घेऊनी ॥ १८७ ॥ माहुरगडापर्यन्त । स्वामींसी पोहो-चविलें सत्य । करून समर्था दंडवत । येते झाले परतोनी ॥ १८८ ॥ त्या तीर्थी दत्ताची । भेटी झाली तया साची । ती पर्वणी आनंदाची ।

शक्ति न मसी वर्णावर्या ॥ १८९ ॥ महाराज ह्मणती दत्ताला । आतां न पुढें येववे मला । येथवरी तव दर्शनाला । शक्ति क्षीण जाहली ॥ १९० ॥ तें ऐकून श्रीदत्त । बोलते झाले तयाप्रत । मी तव सप्त पिढ्यांपर्यंत । कीर्तनीं ढोल वाजवीन ॥१९१॥ अवतारकृत्य झालें पुरें । आतां गमन करी त्वरें । उंबरखेडास साजिरें । ठेवून देहें कलेवर॥१९२॥ ऐकून ते ब्रह्मवचन । अवश्य म्हणती दयाघन । दत्तास करून वंदन । उंबरखेडा पातले ॥ १९३ ॥ संताचार्य बरोबरी । होते तेधवां निर्धारीं । रोग झाला शरीरीं । नळसंग्रहणी नाम ज्याचें ॥ १९४ ॥ त्या सच्छिष्य संताचार्यासी । बोलते झाले पुण्यराशी । एनाथाचे सान्निध्यासी । समाधी द्या रे मजलागीं ॥१९५॥माधवाचार्य माझें पोर । तेथून राहिलें बहु दूर । कैसें यइल येथवर । वनवसाहून ये समयीं ॥ १९६ ॥ दत्ताची आज्ञा मजलागून । झाली वैकुंठीं जाया जाण । एकादशीस प्रधाण । आहे माझें येथूनी ॥१९७॥ दत्तविठ्ठल ते ठाया । आले पुन्हां भेटाया । पहा केवढी आहे माया । सद्भक्ताची प्रभूतें ॥१९८॥ उभयतांनीं शिरीं कर । ठेविला त्यांच्या साचार । समर्थांनीं जोडिले कर । ह्मणती शेवट गोड करा ॥१९९॥ समाधीचे वेळेसी । आपण असावें सान्निध्यासी । न्यावें सादुज्यपदासी । या आपुल्या दासातें ॥ २०० ॥ तथास्तु ह्मणती उभयता । आतां राहिली थोडी कथा । शरीरीं बळावली व्यथा । प्राणघातक नळसंग्रहणी ॥ २०१ ॥ शक्ति अवघी क्षीण झाली । तिथी शुद्ध दशमी आली । जमली सर्व भक्तमंडळी । दर्शन घ्याया तयाचें ॥ २०२ ॥ महाराज ह्मणती अवघ्यांस । मशीं द्या रे संन्यास । आज दशमीचा पुण्य दिवस । वेळ उगाच करूं नका ॥ २०३ ॥ तें मानलें सर्वांसी । दिधला संन्यास समर्थांसी । तिथी योग येतां एकादशी । काय घडलें तें ऐका ॥ २०४॥ भक्तांस बोलके गर्जोन । ह्मणा ह्मणारे नारायण । आपण घ्यातलें पद्मा

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांस कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दश: प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**